नि.दि.दावा. क्र. ५३/१५

**नि.क्र. ३८**

**<u>वादी सुर्यभानचा प्रतीवादी क्र.१ ते ६ तर्फे उलटतपास वकील श्री. अंजनकर.</u>**

हे म्हणणे खरे आहे की, माझे वडीलांचे भाऊ गुलाब झिबल गायकवाड कोतवाल होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील उकंडराव झिबल गायकवाड कोतवाल नव्हते. झिबल गायकवाड हे माझे आजोबा असुन, वडीलांचे भाऊ नाहीत. सरतपासाचे शपथपत्रात परिच्छेद क्र.५ मध्ये चुकुन वडीलांचे भाऊ झिबल गायकवाड कोतवाल असल्याचे नमुद करण्यात आलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासाचे शपथपत्र माझे सांगण्याप्रमाणे नाही. हे म्हणणे खरे नाही की, झिबल गायकवाड माझे आजोबा नाहीत. झिबल गायकवाड माझे आजोबा असल्याचे दर्शविणारा मी ७/१२ उतारा दाखल केलेला आहे.

२ हे म्हणणे खरे आहे की, गुलाब झिबल गायकवाड कोतवाल असल्याने शासनाने त्यांना जमीन कसण्याकरीता दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, कोतवाल डोंगा म्हणजेच दावा मिळकत शासनाच्या मालकीची आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत झिबल गायकवाडने विकत घेतलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत माझे आजोबा झिबल पैकू गायकवाडला वडीलांकडून भेटलेली नाही.

३ सर्व्हे क्र. १२५ चा सर्व्हे क्र.२३८ झाल्याचे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा मी दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, उपविभागीय अधिकारी, सावनेर यांचेकडे केलेल्या अर्जाचे काय झाले हे मला माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी उपविभागीय अधिकारी सावनेर यांचेकडे कुठलाही अर्ज केलेला नसुन, अर्ज केल्याचे खोटे कथन केले आहे.

४ मी होमगार्ड म्हणुन वयाचे ५५ व्या वर्षी सेवानिवृत्त झालेलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, कोतवाल डोंगा ही जमीन हस्तांतरीत करण्यापुर्वी शासनाची पुर्व परवानगी लागते व मालकी हक्काच्या टक्केवारी प्रमाणे शासनाला पैसे द्यावे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत गुलाबचे नावे असतांना त्याची पत्नी अथवा बहीणीने त्यांचे नावे अभिलेख सदरी नोंद व्हावी म्हणुन प्रयत्न देखील केलेला नाही. हे

म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत पुर्वी गुलाबराव आणि आता त्यांचे मुलांचे ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत शासनाकडून गुलाबरावला वहीवाटीकरीता मिळाल्यामुळे गुलाबराव नंतर त्याचे मुलांनी अभिलेख सदरी स्वत:ची नावे नोंद केली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचे मालक शासन आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत मला काहीही अधिकार नसुन, खोटा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, कुटुंबातील कोणाचा मृत्यु केव्हा झाला हे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी दावा मिळकतीच्या अभिलेख सदरी बेकायदेशिररित्या नावे चढून घेतल्याचे खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटा दावा दाखल करुन खोटी साक्ष दिली आहे.

**फेरतपास : काही नाही**

माझे समक्ष,

स्वाक्षरीत/-
( पी.डी. सावंत)
दि.न्या.क.स्तर, कळमेश्वर.
दिनांक : ०४.०१.२०१८.

सा.ब.वा.दा.क.केले.

स्वाक्षरीत/-
(पी.डी. सावंत)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कळमेश्वर.